म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई - ४०० ००५. दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/ २२१६ ३९६५ ई-मेल:
mercindia@merc.gov.in संकेत स्थळ: www.merc.gov.in

जाहिरात क्रमांक.:४०/२०२४

## जाहीर सूचना

### महाराष्ट्रातील स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी आ.व. २०१४-१५ ते २०१९-२० मध्ये केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाच्या पूर्ततेच्या पडताळणीसाठीच्या कार्यवाहीसंबंधी अभिप्राय मागविण्याबाबत

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ), त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१० (आरपीओ विनियम २०१०) आणि आरपीओ विनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) राज्यातील स्व वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी वार्षिक तत्त्वावर करीत असतो. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ने सादर केलेल्या माहितीच्या आधारे, आयोगाने, खालील प्रकरणांमध्ये आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठी कार्यवाही सुरु केली आहे आणि संबंधित स्व वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे उपयोगकर्ते (सीपीपी) आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांना आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठीच्या आरपीओ लक्ष्यांकांच्या पूर्ततेची तपशीलवार माहिती आयोगास देण्याचे निर्देश दिले आहेत.

आयोग, महाऊर्जाने सादर केलेला अहवाल आणि बंधन असलेल्या व्यक्ति/संस्थांचा (एन्टीटीज्) प्रतिसाद यांच्या आधारावर तयार केलेल्या एकत्रित आरपीओ विवरणपत्रावर (जे आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत स्थळावर उतरवून घेण्याजोग्या स्वरुपात उपलबध आहे) जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती लेखी मागवित आहे. स्व वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेच्या पडताळणीवर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे ई सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

| अनु. क्र | तपशील | प्रकरण क्र. | सुनावणीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेच्या उपयोगकर्त्यांनी (सीपीपी) आ.व. २०१४-१५ ते २०१९-२० मध्ये केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाच्या पूर्ततेची पडताळणी | १/एसएम/२०२४ | ३ डिसेंबर, २०२४ | सकाळी १०.३० |
| २ | मुक्त प्रवेश ग्राहकांनी आ.व. २०१४-१५ ते २०१९-२० मध्ये केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाच्या पूर्ततेची पडताळणी | २/एसएम/२०२४ | ३ डिसेंबर, २०२४ | |

प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंना आयोगाच्या (**www.merc.gov.in/e-public-consultation**) या संकेत स्थळावरील 'E-public consultation' या टॅबद्वारे त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये सकाळी **९.३० ते सायंकाळी ६.०० या** दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

**E-Public Consultation** टॅववर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ यांना या पत्त्यावर पाठवावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

वरीलप्रमाणे अभिप्राय/सूचना सादर पाठविणाऱ्या प्रेषक/आक्षेपकाला त्याचे म्हणणे ई जाहीर सुनावणीमध्ये व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्याने/तिने सूचना/हरकती दाखल करताना तसे ठिकाणासह विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकारणी, वैध ई मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील.

जाहीर ई-जन सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी जारी केलेल्या 'आयोगासमोर याचिकेच्या ई सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल' वरील कार्यप्रणाली निर्देशांचे पालन करतील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणाऱ्या ई जाहीर सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल, त्यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी किंवा त्याआधी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती बंधन असलेल्या एन्टीटीजच्या संबंधातील आदेशांना अंतिम स्वरुप देण्याआधी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**सही/-**
**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव, मविनिआ**

**दिनांक: १९ ऑक्टोबर, २०२४**
**ठिकाण: मुंबई**

Size: 8x21 sqcm